SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University
PART-TWO

गुरूवार, दिनांक ९ जानेवारी, २०१४

## अधिसूचना

**क्रमांक : ०२/२०१४** **दिनांक : ०९ जानेवारी, २०१४.**

**विषय : २०१२ - २०१३ शैक्षणिक सत्राची स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती.**

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती दाननिधी विनियमातील तरतुदीप्रमाणे, २०१२ - २०१३ शैक्षणिक सत्रामध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग एण्ड मॅनेजमेन्ट, बडनेरा रेल्वे जि. अमरावती येथे अभियांत्रिकी स्नातक (विद्युत) अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या **श्री संदेश राजेश हरकुट** या विद्यार्थ्याने अभियांत्रिकी स्नातक (विद्युत) प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात सलग उत्तीर्ण होऊन एकत्रितरीत्या सर्वाधिक गुण प्राप्त केल्यामुळे २०१२ - २०१३ शैक्षणिक सत्राच्या स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेला आहे.

**२०१२ - २०१३ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. १,५००/- (अक्षरी रु. एक हजार पांचशे फक्त) ची स्व. दिलीप बी. शिंगोरे शिष्यवृत्ती श्री संदेश राजेश हरकुट यांना प्रदान करण्यात येत आहे.**

स्वा/-
( अ. धों. चव्हाण )
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## अधिसूचना

**क्रमांक : ०३/२०१४** **दिनांक : ०९ जानेवारी, २०१४.**

**विषय : २०१३-२०१४ शैक्षणिक सत्राची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती.**

सर्व सामान्यांचे माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते कि, वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती दाननिधी विनियम क्र. ३१/१९९८ मधील तरतुदीप्रमाणे, कु. रोशनी श्रीरामजी शेंदरकर या विद्यार्थीनीने वाङमय स्नातक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन या अभ्यासक्रमाच्या इतिहास विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करुन २०१३-२०१४ शैक्षणिक सत्रामध्ये शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, येथे वाङमय पारंगत भाग - १ (इतिहास) या वर्गात प्रवेश घेतल्यामुळे, ही विद्यार्थीनी २०१३ - २०१४ या शैक्षणिक सत्राच्या रु. २,८००/- च्या वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे.

**२०१३ - २०१४ या शैक्षणिक सत्रामध्ये रु. २,८००/- (अक्षरी रु. दोन हजार आठशे फक्त) ची वीर उत्तमराव मोहिते शिष्यवृत्ती कु. रोशनी श्रीरामजी शेंदरकर यांना प्रदान करण्यात येत आहे.**

स्वा/-
( अ. धों. चव्हाण )
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

# अधिसूचना

**क्रमांक : ०४/२०१४** **दिनांक : ०९ /०१/२०१४**

**विषय : शैक्षणिक नियामिका ,,, शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ ला शुध्दीपत्रक**
**संदर्भ : अधिसूचना क्र. १७०/२०१२, दि. १७.१२.२०१२**

सर्व संबंधितांच्या माहिती करीता अधिसूचित करण्यात येते की, संदर्भांकित अधिसूचना क्र. १७०/२०१२ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ करीता शैक्षणिक नियामिका प्रसिध्द केली आहे. सदर शैक्षणिक नियामिकेतील तक्ता-ड मध्ये अधिसूचना क्र. १२५/२०१३, दि. ३१.१०.२०१३ अन्वये यापूर्वी अंशतः दुरुस्ती करण्यात आली आहे.

यानंतर महाराष्ट्र शासनाचे राजपत्र असाधारण भाग-१-मध्य उप- विभाग मध्ये प्रसिध्द झालेली असाधारण अधिसूचना क्र. ६६, दि. २८.११.२०१३ लक्षात घेता, सदर शैक्षणिक नियामिकेतील 'तक्ता-ड (सार्वजनिक सुट्या)' मध्ये, खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नव्याने अंशतः दुरुस्ती करण्यात येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| **अ.क्र.** | **सण** | **अधिसूचना क्र. १७०/२०१२ मधील अ.क्र., दिवस व दिनांक** | **सुचविलेला सुधारीत दिवस व दिनांक** |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |
| १. | ईद-ए-मिलाद | १०. शनिवार,दि. २५ जानेवारी,२०१४ | मंगळवार, दि. १४ जानेवारी, २०१४ |

स्वा/-
(अ.धों.चव्हाण)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*******